पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे २४ पासून उद्योजकांशी संवाद व्याख्यानमाला

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजाकता विकास केंद्राच्या वतीने उद्योजक होण्यासाठी 'उद्योजकांशी संवाद' या विषयावर २४ ते २९ मे या कालावधीत पाचदिवसीय ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. ऑनलाईन व्याख्यानमालेत वृषाली बर्वे, कुणाल पाटील, अक्षय चिंचणीकर, इंद्रनील बंकापुरे, हेमंत काळे हे उद्योजक मार्गदर्शन करणार आहेत. याचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समन्वयक प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

पुढारी

# आजअखेर १९८ परीक्षांचे निकाल घोषित

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाच्या वतीने हिवाळी सत्र परीक्षेंतर्गत आजअखेर सुमारे १९८ निकाल घोषित केले आहेत. परीक्षा विभागाच्या वतीने ऑनलाईन पद्धतीने २२ मार्चपासून परीक्षा सुरू आहेत. परीक्षा संपेल तसे निकाल जाहीर केले जात आहेत. २० मे रोजी एम.टेक. रूरल टेक्नॉलॉजी सत्र-५, एम. टेक. सत्र-१, बी.ए.-ड्रेस मेकिंग सत्र १ व २, एमबीए डिस्टन्स, एम.कॉम. सत्र-३, एमएसडब्ल्यू (सीबीसीएस) सत्र-३, बीई सत्र-७, एम.फार्मा. सत्र-२ व ३, एम.ए.-समाजशास्त्र सत्र-३ आदी १३ परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहेत. दरम्यान, शिवाजी विद्यापीठ हिवाळी सत्र ऑक्टोबर-नोव्हेंबर ऑनलाईन परीक्षेंतर्गत गुरुवारी ५ हजार विद्यार्थ्यांपैकी ४ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

सकाळ

# संशोधन केवळ पदवीसाठी मर्यादित राहू नये : डॉ. सलगर

## कौशल्य विकास केंद्रातर्फे व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : संशोधकांचे संशोधन केवळ पदवीसाठी मर्यादित न राहता संशोधनाची निरंतर वृत्ती विकसित होण्यासाठी शोधनिबंधाची निर्मिती आवश्यक आहे. यातून नवीन ज्ञानाची निर्मिती होईल व संशोधन वृत्ती जोपासली जाईल, असे मत डॉ. सचिन सलगर यांनी व्यक्त केले.



शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्रातर्फे 'संशोधन पद्धती' विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेत ते बोलत होते. यावेळी प्रा. डॉ. ए. एम. गुरव उपस्थित होते. व्याख्यानात देशभरातून संशोधक विद्यार्थी सहभागी झाले.

डॉ. सलगर म्हणाले, 'एखादी पदवी मिळवण्यासाठी संशोधक संशोधन करत असतो. असे न करता संशोधकांनी संशोधन वृत्ती निरंतर जोपासणे गरजेचे आहे. यासाठी शोधनिबंध तयार करण्याची कौशल्ये आत्मसात करावी. शोधनिबंध वैयक्तिक ज्ञानामध्ये भर घालतीलच; पण यातून सातत्याने नवीन माहिती इतर संशोधकांना उपयुक्त ठरेल. शोधनिबंध तयार करत असताना शोधनिबंध तयार करण्याचे निकष अभ्यासणे गरजेचे आहे.''

शोधनिबंध केल्याने केवळ इतरांना लाभ होतो, असे नाही तर व्यावसायिक विकासासाठी शोधानिबंध महत्वाचे ठरतात. संशोधन शोधनिबंध तयार करताना समस्येचे अपेक्षित व उपयुक्त निष्कर्ष प्राप्त होण्यासाठी उद्दिष्टाची निश्चिती, गृहितके, परिकल्पना, नमुना याची मांडणी अचूक करणे आवश्यक आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. महेश चव्हाण यांनी आभार मानले.

तरुण भारत

# पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम बदलणार

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम यंदा बदलणार आहे. या पार्श्वभूमीवर विविध अभ्यास मंडळाच्या ऑनलाईन बैठका सुरु झाल्या आहेत. तज्ज्ञांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमावर या बैठकांमध्ये चर्चा होत आहे. नवीन अभ्यासक्रमाचा प्रस्ताव बोर्ड ऑफ डीन मंडळासमोर मान्यतेसाठी ठेवण्यात आला आहे. त्यांची मान्यता मिळताच विविध अधिकार मंडळांच्या मान्यतेने अभ्यासक्रमाला अंतिम मंजुरी दिली जाणार आहे. २०२१-२१ या शैक्षणिक वर्षात बदललेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजवणी करण्यात येणार आहे.

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत २०९ महाविद्यालयांमधील पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रम बदलण्याची प्रक्रिया सुरु आहे. नवीन अभ्यासक्रमातही विद्यार्थ्यांना चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टिम अंतर्गत आपल्या आवडीचा विषय निवडता येणार आहे. यामध्ये एखाद्या शाखेचा विद्यार्थी इतर कोणत्याही शाखेचा एक विषय निवडून त्यामध्ये शिक्षण घेऊ शकतो. त्यामुळे त्याला आपल्या अभ्यासाबरोबर आवडीच्या विषयाचे ज्ञानही मिळते. तसेच नवीन अभ्यासक्रमात संशोधनाला प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे पदवी प्रथम वर्षापासूनच संशोधनाला चालना मिळणार आहे. त्याचबरोबर विज्ञान विभागाच्या विद्यार्थ्यांना कंपन्यांमध्ये जाऊन प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळणार आहे. यातून विद्यार्थ्यांचे कौशल्य विकसित होण्यास चालना मिळणार आहे. यातून रोजगाराच्या संधीदेखील वाढणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये बदललेला अभ्यासक्रम लागू करण्याचे प्रस्तावित आहे. परंतू अभ्यास मंडळाच्या बैठका प्रत्यक्ष घेता येत नसल्याने ऑनलाईन पद्धतीने बैठका सुरु आहेत. ऑनलाईन बैठकांमध्ये सविस्तर चर्चा करता येत नसल्याने अभ्यासक्रम तयार करण्यास वेळ लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. अभ्यासक्रम बदलाचा प्रस्ताव बोर्ड ऑफ डीन मंडळासमोर ठेवण्यात आला आहे. त्यांची मान्यता मिळताच हा प्रस्ताव विविध अधिकार मंडळासमोर ठेवून मान्यता घेण्यात येईल. ऑनलाईन बैठकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे अभ्यासक्रमाचा डेटा गोळा करण्यास अडचणी येत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ला लागू करावा, अशी मागणी काही प्राध्यापकांनी विद्यापीठ अभ्यास मंडळाकडे करण्यात आली आहे.



- बोर्ड ऑफ डीन मंडळाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवला
- प्रत्येक विषयाच्या अभ्यासमंडळांच्या ऑनलाईन बैठकांना जोर
- विविध अधिकार मंडळांच्या मान्यतेनंतर अंतिम निर्णय

### चर्चा करुनच अंतिम निर्णय

एखादा अभ्यासक्रम तयार करण्यासाठी किमान एक वर्षाचा कालावधी लागतो. कोरोनामुळे अभ्यास मंडळाच्या ऑनलाईन बैठका झाल्या आहेत. पदवी प्रथम वर्षाचा अभ्यासक्रमातील बदलाचा प्रस्ताव बोर्ड ऑफ डीन मंडळासमोर ठेवला आहे. त्यांची मान्यता मिळाल्यानंतर कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी चर्चा करून विविध अधिकार मंडळाची मान्यता घेतली जाईल. त्यानंतर अंतिम निर्णय घेतला जाईल.

**डॉ. संजय कुबल (उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ)**

तरुण भारत

# विद्यापीठात उद्योजकता संवाद व्याख्यानमाला

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उदोजाकता विकास केंद्राच्या उद्योजक होण्यासाठी उद्योजकांशी सवांद या विषयावर पाच दिवसीय ऑनलाईन व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. २४ ते २९ मे या कालावधीत ही व्याख्यानमाला होणार आहे. तरी या व्याख्यानाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे. या व्याख्यानमालेत वृषाली बर्वे, कुणाल पाटील, अक्षय चिंचणीकर, इंद्रनील बंकापुरे, हेमंत काळे हे उद्योजक मार्गदर्शन करणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 MAY 2021 तरुण भारत

# उपयुक्त संशोधन समस्या निवड काळाची गरज

## डॉ. कृष्णा पाटील यांचे मत : कौशल्य,उद्योजकता विकास केंद्राचे ऑनलाईन व्याख्यान

प्रतिनिधी
कोल्हापूर

आजच्या काळात संशोधन करत असताना संशोधन समस्येची निवड करताना ती त्या विषयाची व्याप्ती वाढवणारी असावी. यासाठी उपयुक्त समस्येची निवड ही काळाची गरज आहे. या निवडीमुळे होणारे संशोधन भविष्यात सर्व घटकांना उपयुक्त ठरेल व आपल्या संशोधांची गुणवत्ता सिध्द करता येईल, असे मत डॉ. कृष्णा पाटील यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राच्या वतीने संशोधन पद्धती या विषयावरील ऑनलाईन व्याख्यानमालेतील संशोधन प्रस्ताव तयार करणे या विषयावर ते बोलत होते. डॉ. ए. एम. गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती. या व्याख्यानामध्ये देशभरातून संशोधक विद्यार्थी सहभागी झाले आहेत.



डॉ. पाटील म्हणाले, संशोधनातून आपल्या देशाला, समाजाला व आपल्या विषयाला न्याय मिळावा. संशोधनाची समस्या निवडताना आवश्यक घटकांचा विचार केला पाहिजे. संशोधन समस्येची निवड हि बाब आपल्या संशोधनाचा पाया असते. संशोधन प्रस्ताव तयार करण्याचे निकष संशोधकाने अभ्यासाने गरजेचे आहे. या निकषाचा आधार घेवून संशोधकाने अगोदर झालेल्या संशोधनाचा आढावा घेतला तर योग्य दिशा मिळेल. संशोधनाची उद्दिष्टे तयार करतान संशोधन समस्येचा शास्त्रीय अभ्यास करून मांडणी करणे गरजेचे आहे. संशोधन विषयाचा समावेश प्रस्तावात असावा. संशोधन प्रस्ताव संशोधन पूर्ण होईपर्यंत आपणास दिशादर्शक ठरतो. संशोधनासाठी उपयुक्त संशोधन पद्धती, साधने, तंत्रे, आवश्यक जनसंख्या, नमुना याबाबींची सुयोग्य निवड महत्वाची आहे. आपल्या संपूर्ण संशोधनाची गुणवत्ता, संशोधनाचा दर्जा, त्याची उपयुक्तता संशोधन प्रस्तावाच्या गुणवत्तेवर आधारित आहे. दर्जेदार संशोधनातून राष्ट्राच्या व समाजाच्या विकास करावा. प्रास्ताविक महेश चव्हाण यांनी केले.